# बृहन्मुंबई महानगरपालिका

सआकेप / ओडी / ११ / अति. निर्मू. दि. २६.०४.२०२३

## जाहिर सुचना

विषय- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फेत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, के/पश्चिम विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था या संस्थांकडुन माहे मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीकरिता अतिक्रमण निर्मुलन वाहनावर एकुण १५ कंत्राटी कामगार पुरविण्याकरिता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन), बृहन्मुंबई महानगरपालिका के/प विभाग कार्यालय, पाचवा मजला, पालीराम पथ, बी.ई.एस.टी डेपो समोर, पालीराम पथ, एस. व्ही. रोड, अंधेरी (प) मुंबई- ४०००५८ येथे २८४६/- रूपये अधिक १८% वस्तु व सेवा कर आकारून (ना-परतावा) रोख स्वरूपात चलन काढून दि. २८.०४.२०२३ ते दि. ०८.०५.२०२३ या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. ०८.०५.२०२३ पर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, के/पश्चिम विभाग, पाचवा मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख दि. १०.०५.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभाग**